!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प १९२/०४/०३/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# आशा सूवर्णयुगाची कार्यक्रमाने महिला सांस्कृतिक आघाडीच्यावतीने महिलादिन साजरा

## मनोरंजन, प्रश्नमंजुषा, लक्की ड्रा, बक्षीसे, देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रमाला प्रतिसाद

**संभाजीनगर : ( ता.०८ )** शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला सांस्कृतिक आघाडीच्यावतीने जागतिक महिला दिन आगळया-वेगळया पध्दतीने साजरा करण्यात आला. आलाप प्रस्तुत आशा सुवर्णयुगाची कार्यकमाने महिलांना विविध स्पर्धेत, मनोरंजनात भाग घेता आला. व भव्य बक्षीसांची लयलूट करण्यात आली. ७ मार्च रोजी सायं. ७ वाजता तापडिया नाट्य मंदिरात झालेल्या कार्यकमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यकमाचे उद्घाटक म्हणुन महापौर कला ओझा यांच्याहस्ते तर प्रमुख उपस्थिती म्हणुन वैजयंती खैरे, सुभद्राताई कपाटे, माजी महापौर अनिता घोडके, सौ. संगिता पारनेरकर, सांस्कृतिक आघाडीच्या जिल्हा संघटक रंजना कुलकर्णी, मिरा देशपांडे, नलिनी बाहेती, शुभांगी लातुरकर, दुर्गा भाटी, राजश्री पोफळे, सुनिता देव, कमल चके, नलिनी महाजन, लक्ष्मी नरहिरे, आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांस्कृतिक आघाडीच्यावतीने शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे, जिल्हाप्रमुख सुहास दाशरथे, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडले, बंडू ओक यांच्या सत्कार करुन महिला आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आभार मानले.

आलाप ग्रुपचे अभिजीत शिंदे व सरला शिंदे या जोडीने उपस्थितांचे मन जिंकणारी गाणे गायली तर सुत्रसंचालन करतांनी आर. जे. प्रणिता हिने प्रेषकांना खळखळून हाण्यास भाग पाडले. कार्यक्रमांसाठी अंजली मांडवकर, मंजुषा नागरे, रश्मी ढापरे, किरण शर्मा, मिना बेलसरे, रुपाली जोशी, साधना मोरे, मानसी देशपांडे यांची उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400